**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.**

**सं.फौ.ख.क्र. २७०/२०२४.**
**सरकार वि. इंद्रजित.**
**नि. क्र. ७/ सी**

१) अपराध घडल्याचा तारीख – १५.०१.२०२४.

२) अपराध नोंद झाल्याची तारीख – १९०१.२०२४.

३) फिर्यादीचे नाव व पत्ता – **महाराष्ट्र शासन,**
पोलिस ठाणे, आजरा.

४) आरोपीचे नाव व पत्ता – **इंद्रजित संभाजी तुरंबेकर.**
वयः– २३ वर्षे, धंदाः चालक,
रा. वांजोळेवाडी, उत्तूर, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

५) गुन्हयाचे विवरण –

तुम्ही दिनांक १५/०१/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजेच्या दरम्यान उत्तूर– निपाणी रोडवर लोखंडे पेट्रोलपंप ते वांजोळवाडी वस्ती दरम्यान रोडवर तुमच्या ताब्यातील छोटा हत्ती गाडी क्र. एच.एच–०९–सी.यू.–०६५५ मानवी जिवित धोक्यात येईल, अगर अन्य व्यक्तीला दुखापत, अगर नुकसान पोहचण्याचा संभव आहे इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवुन भारतीय दंड विधान कलम **२७९** प्रमाणे गुन्हा केला व माझे दखलगिरीत आहे.

तसेच त्याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आपले वरील वाहन, मानवी जीवित किंवा इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून फिर्यादीच्या मोटरसायकल क्र. एम.एच.–०९–डी.आर.–६१०५ ला समोरुन ठोकरुन त्यांना किरकोळ दुखापत करुन त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम **३३७** प्रमाणे शिक्षेस पात्र गुन्हा केला व माझे दखलगिरीत आहे.

तसेच त्याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आपले वरील वाहन, मानवी जीवित किंवा इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून फिर्यादीचे मोटरसायकलला समोरुन ठोकरुन जबर/गंभीर दुखापत करुन त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम **३३८** प्रमाणे शिक्षेस पात्र गुन्हा केला व माझे दखलगिरीत आहे.

तसेच त्याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही फिर्यादीच्या मोटारसायकलला समोरुन ठोकरुन नुकसान करुन भारतीय दंड संहिता कलम **४२७** प्रमाणे गुन्हा केला असुन माझे दखलगिरीत आहे.

तसेच त्याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आपले वरील वाहन सार्वजनिक रस्त्याची कोणतीही परिस्थिती लक्षात न घेता मानवी जिवीत धोक्यात येईल अशा रितीने अतिशय वेगात चालवुन मोटार वाहन कायद्याचे कलम **१८४** प्रमाणे शिक्षेस पात्र गुन्हा केला व माझे दखलगिरीत आहे.

आणि मी याद्वारे असे निर्देशित करीतो की, तुम्हाविरुध्द या न्यायालयात वरील प्रमाणे दोषारोप ठेवुन प्रकरण चालविण्यात येणार आहे.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

( आर. पी . थोरे )

दिनांक – ०५.०९.२०२४.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
आजरा.

६. **<u>आरोपीचे कथन</u>**

प्र.क्र.१– तुम्हाला सदर गुन्हयातील कागदपत्रांच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तरः– होय.

प्र.क्र.२– तुमच्यावर ठेवलेला आरोप तुम्हास वाचुन दाखविला, तो तुम्हाला समजला काय ?
उत्तरः– होय.

प्र.क्र.३– तुम्हाला सरकारतर्फे वकील पाहिजे ?
उत्तरः– नाही.

प्र.क्र.४– तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तरः– नाही.

------------------
आरोपीची सही/निशाणी अंगठा.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

( आर. पी . थोरे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
आजरा.

दिनांक – ०५.०९.२०२४.